सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४० | मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com



## निवड समितीने केला अन्याय नियतीने मात्र दिला न्याय

अमोल मुझुमदार,

कोणी आऊट झाला तर आपल्याला जावे लागेल म्हणून पॅव्हेलियनमध्ये पॅड लाऊन बसला होता. तेव्हा सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी यांनी ६६४ रन बनवले होते... तो आपली वेळ येण्याची वाट पाहत होता आणि तेव्हापासून आयुष्याने त्याला वाट पाहत ठेवले. अनेक वर्षांनंतर तो विश्वचषक जिंकतो – खेळाडू म्हणून नाही तर प्रशिक्षक म्हणून. खेळाडूंच्या काही पटकथा निवडकर्त्यांनी लिहिल्या आहेत. पण मुजुमदार यांची ही कथा नियतीने लिहिली आहे. रणजी क्रिकेटमध्ये ११ हजार धावा व ३० शतके त्यांच्या नावावर आहेत. असे असूनही भारतीय संघात समावेशाबाबत निवड समितीकडून मुजुमदार यांच्यावर नेहमी अन्यायच झाला. मात्र भारतीय महिला संघाला आपल्या कुशल प्रशिक्षकाच्या भूमिकेतून विश्वविजेतपद मिळवून दिल्याने त्यांना खऱ्या अर्थाने नियतीनेच न्याय दिला आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर विजयानंतर मुजुमदार यांच्या पायावर नतमस्तक झाली. हरमनप्रीतने त्यांना जणू ही गुरुदक्षिणाच दिली. विश्वचषक प्राप्ती आणि हरमनप्रीतची गुरुदक्षिणा यामुळे मुजुमदार यांनी निश्चितपणे नियती आणि परमेश्वराचे आभार मानले असतील.

# शाब्बास मुलींनो !

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, विराट कोहली, सचिन तेंडुलकरपासून नीरज चोप्रापर्यंत शुभेच्छांचा वर्षाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघाने वनडे वर्ल्ड कप जिंकून इतिहास रचला. सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांनी भारतीय महिला संघाचे अभिनंदन केले. हरमनप्रीत कौरने भारतीय महिला संघाची पहिली वर्ल्ड कप विजेती कर्णधार ठरण्याचाही मान मिळवला. भारतीय संघाने तिसऱ्यांदा अंतिम सामना गाठला होता, याआधी दोनदा विजयाच्या जवळ जाऊनही भारतीय संघाला वर्ल्ड कप जिंकता आला नव्हता. पण अखेर तिसऱ्या प्रयत्नात भारताच्या रागिणीनींनी अखेर जगज्जेतेपद मिळवले. त्यामुळे सध्या भारतीय महिला संघावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. विविध क्षेत्रातील अनेक मोठ्या सेलिब्रिटी आणि मान्यवरांनी भारतीय महिला संघाचे अभिनंदन केले आहे. भारतीय पुरुष संघाचा टी २० वर्ल्ड कप आणि चॅम्पिटन्स ट्रॉफी विजेता कर्णधार रोहित शर्मा तर स्टेडियममध्ये उपस्थित होता. त्याच्यासह सचिन तेंडुलकर, सुनील गावसकर, व्हीव्हीएस लक्ष्मण असे अनेक स्टार स्टेडियममध्ये होते.

दरम्यान, भारतीय संघाने विजेतेपद मिळवल्यानंतर भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने एक मोठी पोस्ट लिहित अभिनंदन केले. त्याने लिहिले, की 'मुलींनी इतिहास घडवला. मला भारतीय म्हणून प्रचंड अभिमान वाटत आहे. अनेक वर्षांची मेहनत फळाला आली. हे ऐतिहासिक यश मिळाल्याबद्दल हरमन आणि संपूर्ण संघ अभिनंदनासाठी आणि मोठ्या कौतुकासाठी पात्र आहेत. संपूर्ण संघाचे आणि पडद्यामागे काम करणाऱ्या व्यवस्थापनाचे अभिनंदन. वेल डन इंडिया. या क्षणांचा आनंद घ्या. पुढच्या पिढीच्या अनेक मुलींना हा क्षण प्रेरणा देणार आहे. जय हिंद.'

मास्टर- ब्लास्टर सचिन तेंडुलकरने लिहिले, '१९८३ च्या विजयाने एका संपूर्ण पिढीला मोठी स्वप्न पाहाण्याची आणि पूर्ण करण्याची प्रेरणा दिली होती. आज आपल्या महिला क्रिकेट संघाने असेच काहीतरी खास करून दाखवले आहे. त्यांनी देशातील असंख्य मुलींना बॅट आणि बॉल हातात घेण्यासाठी आणि त्यासुद्धा एकदिवस ट्रॉफी जिंकू शकतात यावर विश्वास ठेवण्यासाठी प्रेरणा दिली आहे. भारतीय महिला क्रिकेटच्या प्रवासातील हा एक निर्णायक क्षण ठरला. वेल डन टीम इंडिया, तुमचा संपूर्ण देशाला अभिमान आहे.'

भारताचा ऑलिम्पिक विजेता नीरज चोप्राने पोस्ट करुन लिहिले, की 'वर्ल्ड चॅम्पियन ! भारतीय महिला क्रिकेट संघाला त्यांच्या पहिल्या वनडे वर्ल्ड कप विजयाबद्दल अभिनंदन. अफलातून कामगिरी.'

भारताच्या राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनींही अभिनंदनाची पोस्ट केली असून त्यात त्यांनी लिहिले की 'भारतीय क्रिकेट संघातील प्रत्येक सदस्याचे वर्ल्ड कप जिंकल्याबद्दल मनापासून अभिनंदन. त्यांनी पहिल्यांदा ही ट्रॉफी जिंकून इतिहास घडवला आहे. त्यांना आज त्यांच्या प्रतिभेला आणि कामगिरीला साजेसा निकाल मिळाला. हा क्षण महिला क्रिकेटला आणखी उंचीवर घेऊन जाईल. भारतीय मुलींनी जी अभिमानास्पद कामगिरी केली, त्याचे मी कौतुक करते.' याशिवाय भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोस्टमध्ये म्हटले, की 'महिला क्रिकेट वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने अफलातून विजय मिळवला. अंतिम सामन्यातील त्यांच्या कामगिरी कौशल्यपूर्ण आणि आत्मविश्वासाने भरलेली होती. संपूर्ण स्पर्धेत संघाने सांघिक कामगिरी केली आणि चिकाटी दाखवली. आपल्या खेळाडूंचे अभिनंदन. हा ऐतिहासिक विजय भविष्यातील चॅम्पियन्सला प्रेरणा देईल.'




# हे महिला बालविकास कार्यालय आहे की, भंगार मालाचे गोडावून ?

## प्रशासनाचे दूर्लक्ष; इमारत जीर्ण, गेट तुटले, भिंतीही शेवाळल्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर शहरातील महिला व बालविकास सेवा योजना कार्यालयाची इमारत अत्यंत जीर्ण झाली आहे. महिला, बालक आणि अंगणवाडी सेविका यांच्या योजनांचे केंद्रस्थान असलेले या कार्यालयाकडे प्रशासनाचे दूर्लक्ष आहे. भिंती जीर्ण झालेल्या आहेत. रंग निघालेले आहेत. दरवाजे तुटलेले आहेत. सर्वत्र शेवाळाचे साम्राज्य आहे. हे महिला बालविकास कार्यालय आहे की, भंगार मालाचे गोडावून ? हेच कळेनासे झाले आहे.

इमारतीच्या समोर आणि चौफेर भागात मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे. आवारात मोठ्या प्रमाणात चिखल आहे. पाणथळीतून दुर्गंधी पसरली आहे. डासांची उत्पत्ती वाढली आहे. परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कार्यालयात येणाऱ्या महिलांची गैरसोय झाली आहे. परिसरात पावसाचे पाणी साचल्याने चालण्यासही जागा नसते. अनेकदा सदर कार्यालयात जाणारे- येणारे या चिखलात घसरुन पडतात. अनेकांचे कपडे खराब होतात. कार्यालयाच्या आवाराभोवती असलेले कंपाउंडचे गेट पूर्ण तुटलेले आहे. गेटच्या ठिकाणीच कचऱ्याचा मोठा ढिग साचला आहे. प्लॅस्टिक, कुजलेला कचरा

पान ३ वर



### लाखो रुपये गेले पाण्यात

महिला बालकल्याण विभागाकडे अनेक वंचित मदतीच्या अपेक्षेने जातात. सदर विभागाच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च केले जातात. मात्र, प्रत्यक्ष कार्यालयाचीच अशी परिस्थिती कशी काय ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. सरकारी योजना फाइलमध्ये अडकून पडल्या आहेत. प्रत्यक्षात महिला व बालकल्याणाचे कार्यालयच मदतीसाठी याचना करीत असल्याचे चित्र आहे.

# श्री मंगळ ग्रह मंदिरात उद्या श्री तुळशी विवाह सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील मंगळ ग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळ ग्रह मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही त्रिपुरारी पौर्णिमेला अर्थात पाच नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजून २२ मिनिटांनी तुळशी विवाह सोहळा होणार आहे. श्री मंगळ ग्रह मंदिरातील तुळशी विवाह सोहळा निमित्ताने दरवर्षी खूप भव्य प्रमाणात मोठी रोषणाई, हळदीचा व संगीताचा कार्यक्रम, सुशोभीकरण आणि हजारो भाविकांना संस्थेतर्फे स्नेहभोजन दिले जात होते. मात्र संस्थेने १० जून पासून अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेतर्फे अत्यंत समाजाभिमुख व काळाची गरज असलेला एक उपक्रम राबवण्यास प्रारंभ केला आहे. त्या उपक्रमांतर्गत अभिषेकासाठी येणाऱ्या सर्वच भाविकांना लग्न सोहळे अत्यंत साधेपणाने, पारंपरिक हिंदू संस्कृतीने करण्याबाबतची शपथ देण्यात येते. सदर शपथेत हुंडा देणार नाही- हुंडा घेणार नाही, कौटुंबिक हिंसाचार करणार नाही, कायम व्यसनमुक्त राहू, आई- वडिलांना वृद्धाश्रमात पाठवणार नाही यासारख्या अनेक बाबींची ही शपथ देण्यात येते. त्यामुळे संस्थेने देखील या वर्षापासून श्री तुळशी विवाह सोहळा अत्यंत साध्या पद्धतीने मात्र पूर्णतः हिंदू व शास्त्रोक्त पद्धतीने साजरा करण्याचे ठरविले आहे. या निमित्ताने कोणतेही भव्य रोषणाई, सजावट ताम- झाम व स्नेहभोजन नसेल.




**श्री तुळशी विवाहानिमित्त श्री मंगळ ग्रह मंदिरात केलेली फुलांची मनोहारी सजावट.**

# भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाने नागरिक त्रस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



शहरातील विविध भागात भटक्या कुत्र्यांचे टोळकेच्या टोळके दिसून येतात. कुत्र्यांच्या उपद्रवाने नागरिक त्रस्त झाले आहेत. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना याचा सर्वाधिक त्रास होत आहे. यामुळे पालकांनी चिंता व्यक्त केली आहे. पालिका प्रशासनाने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह परिसर, न्यू प्लॉट, ढेकू रोड, पिंपळे रोड, पटवारी कॉलनी आदी भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. कुत्र्यांच्या एक, दोन नव्हे तर तब्बल १० ते बारा कुत्रे घोळक्या घोळक्याने भटकताना दिसतात. दुचाकीस्वार, अबालवृद्धांच्या अंगावर कुत्रे धावून जातात. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील विविध भागांत कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ले करून चावल्याच्या घटना घडल्या आहेत, लहान मुले शाळेत जाण्यासाठी, घरी निघताना, सकाळी फिरायला जाणारे वृद्ध नागरिक या कुत्र्यांच्या भयंकर उपद्रवाने घराबाहेरही पडत नाही. काही भागात तर मोकाट कुत्र्यांचा उपद्रव इतका वाढला आहे, की रस्त्यावरून जाणे धोकादायक ठरत आहे. कुत्र्यांनी लहान मुलांचा चावा घेतल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. पालकांनी तक्रारी करुनही पालिकेकडून कुठलाही बंदोस्त करण्यात आलेला नाही. याकडे गांभिर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

### दिनविशेष

४ नोव्हेंबर

- पुण्यात डेक्कन सभेची स्थापना झाली
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील संविधान सभेने संविधानाचा मसुदा सादर केला.
- डॉ. श्रीराम लागू आणि सत्यदेव दुबे यांना कला गौरव प्रतिष्ठानतर्फे नाट्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीतातील असामान्य कामगिरीबद्दल गायक पं. भीमसेन जोशी यांना आदित्य विक्रम बिर्ला कलाशिखर पुरस्कार जाहीर.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा- जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# अमळनेर मराठी वाङमय मंडळ निवडणुकीतून उमटलेले अंतर्मुख प्रश्न!

**मिलिंद पाटील, पत्रकार, अमळनेर**

अमळनेर हे नाव ऐकले की, अनेकांच्या मनात सांस्कृतिक ओळख, साहित्यिक परंपरा आणि बौद्धिक चैतन्याची प्रतिमा उभी राहते.मराठी वाङ्मय मंडळ ही त्याच भावविश्वाची एक स्थिर मूर्ती आहे. गेल्या कित्येक दशकांपासून मराठी शब्दसंस्कृतीची ज्योत जपणारी संस्था.पण या वेळी झालेली निवडणूक ही केवळ पदांसाठीची स्पर्धा नव्हती; ती होती विचारसरणींच्या संघर्षातून उभा राहिलेला आरसा.

एकेकाळी एकत्र, आज दोन बाजू डॉ. अविनाश जोशी यांच्या अभिजात पॅनलचा विजय निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यांनी मंडळाच्या स्थैर्याचा आणि परंपरेचा ध्वज उंच ठेवला. त्यांच्या पॅनलमधून विजयी झालेले पुढील कार्यकर्ते म्हणजे अध्यक्षः डॉ. अविनाश जोशी



डॉ.अविनाश जोशी



श्री. शरद सोनवणे

(पॅनल प्रमुख), कार्यवाह : भैय्यासाहेब मगर, प्रा. श्याम पवार, कार्यकारी सदस्य : सौ. वसुंधरा लांडगे, श्रीमती स्नेहा एकतारे, डॉ. महेश पाटील, बन्सीलाल भागवत, प्रा. विजय तुंटे आणि संदीप घोरपडे. तरी देखील शरद सोनवणे यांच्या परिवर्तन पॅनलचे ७ उमेदवार निवडून येणे हे एक संकेत आहे, की बदलाची चाहूल लोकांच्या मनात आहे. त्या पॅनलमधून विजयी झालेले प्रतिनिधी म्हणजे उपाध्यक्ष : विवेकानंद भांडारकर, डॉ. रवींद्र कुलकर्णी, कार्यवाह : प्रदीप साळवी, कोषाध्यक्ष : प्रा. उदय देशपांडे, कार्यकारी सदस्यः सौ. कांचन शाह, सोमनाथ ब्रम्हे आणि के. व्ही. कुलकर्णी.

### संस्था की व्यक्ती ?

जे लोक एकेकाळी एकाच टेबलावर बसून कार्य करत होते, ते आज दोन पॅनलमध्ये विभागले गेले. हा प्रसंग केवळ संघटनात्मक नाही, तर मानवी नात्यांच्या गुंतागुंतीचा आरसा आहे. लोकशाही यालाच म्हणतात. तरीही आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी विचारावेसे वाटते. आपण संस्थेची सेवा करतोय की आपल्या अहंकाराची ?

### बिनविरोध निवडणुकीची इच्छा आणि वास्तव

मराठी वाङमय मंडळासारख्या सांस्कृतिक संस्थेत निवडणूक म्हणजे एक औपचारिक प्रक्रिया असते, संघर्ष नव्हे. पण यावेळी काही व्यक्तींच्या "माझ्याच विचारांचा विजय व्हावा" या हट्टामुळे वातावरण थोडे गढूळ झाले. आणि हे गढूळपण साहित्यिकतेच्या नितळ पाण्यावर एक छाया टाकून गेले. पण या छायेतही एक शिकवण आहे. " मतभेद म्हणजे विघातकता नव्हे; तो विकासाचा पहिला टप्पा असतो, जर संवाद जिवंत असेल तरच संस्था जिवंत राहते."

### साहित्य संमेलनाचा अनुभव आणि त्याची छाया

अलीकडे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाने मंडळाला ओळख मिळवून दिली, पण त्याच वेळी काही मतभेदही पेरले. कदाचित यशाच्या झळाळीत संवाद हरवला; आणि मग टीका, कुजबुज, वाद यांच्या छटांनी मंडळाचे आकाश झाकले गेले. मात्र, इतिहास सांगतो प्रत्येक संस्थेच्या प्रवासात एक टप्पा असा येतो, जिथे अहंकार आणि आदर्श यांच्यातील संघर्ष होतो. या टप्प्यावर घेतलेले निर्णय ठरवतात की संस्था पुढे एकत्र चालेल की तुटेल.

### विजयाचा अर्थ आणि जबाबदारी

डॉ. अविनाश जोशी यांच्या नेतृत्वाखालील अभिजात पॅनलचा विजय हा निश्चितच मंडळाच्या स्थैर्याचा दाखला आहे. मात्र, या विजयाने अभिजात पॅनलच्या खांद्यावर जबाबदारी आणखी वाढली आहे. त्यांनी विजयाचा आनंद नव्हे, तर नम्रतेचा दायित्वभाव अंगीकारावा लागेल. कारण लोकांनी तुम्हाला मत दिलं, पण अपेक्षा ठेवली आहे.

### संस्था तुटू नये, ती वाढावी.

दुसरीकडे, परिवर्तन पॅनललाही आत्मपरीक्षण

पान ३ वर

# हरमनप्रीत ट्रॉफी घेताना जय शहा यांच्या पडली पाया

## भारतीय संस्कृती आणि संस्काराचे दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हरमनप्रीत कौर व भारतीय महिला संघाने वनडे विश्वचषकाच्या ट्रॉफीबरोबर अनोखे सेलिब्रेशन केले आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात महिला विश्वचषक २०२५चा अंतिम सामना खेळवला गेला. या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला. शफाली वर्मा, दीप्ती शर्मा भारताच्या या विजयाच्या हिरो ठरल्या. टीम इंडियाने विजेतेपद पटकावल्यानंतर केलेल्या अनोख्या सेलिब्रेशनचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.

भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांच्याकडून विश्वचषकाची ट्रॉफी स्वीकारली. हरमनप्रीतने ट्रॉफी स्वीकारताना जय शहा यांच्या पाया पडली. यानंतर हल्ली कोणत्याही स्पर्धेचे जेतेपद पटकावल्यानंतर रोहित शर्माने टी- २० वर्ल्डकप २०२४ व लिओनेल मेस्सी फिफा वर्ल्डकप जेतेपद पटकावल्यानंतर ट्रॉफीसह केलेले सेलिब्रेशन केले. मात्र, हरमन भांगडा करत ट्रॉफी स्वीकारण्यासाठी गेली आणि संघासह तिने हटके सेलिब्रेशन केले. हरमन ही नव्या पिढीची आणि आधुनिक विचारांची मुलगी आहे. मात्र या आधुनिकतेवर तिने स्वैरपणाचा कोणताही गंज लागू दिलेला नाही. भारतीय संस्कृती व संस्कार तिच्यात थेट रुजले असल्याचे यानिमित्ताने पहावयास मिळाले. आनंदाच्या जोशात ती होश हरवून बसली नाही. तर अत्यानंदाच्या प्रसंगीही तिने संयमशील संस्काराचे जिते जागते उदाहरण आजच्या तरूण पिढीसमोर ठेवले आहे. तिने भारतीय महिला क्रिकेट संघाचे कोच अमोल मुजुमदार यांचे चरण स्पर्श करून कृतज्ञता तर व्यक्त केलीच होती. मात्र जय शाह यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारल्यानंतर ती त्यांच्याही पाया पडली. आजपर्यंत कोणत्याही मोठ्या स्पर्धेचे मोठे विजेतेपद मिळविल्यानंतर कोणीही दाखविला नाही इतका मनाचा मोठेपणा हरमन ने दाखवून ती फक्त खेळाडू म्हणूनच नव्हे तर माणूस म्हणूनही किती मोठी आहे हेच जणू या निमित्ताने सिद्ध केले. चक दे इंडिया...!

# स्मृती मानधनाने घडवला फायनलमध्ये इतिहास!

## वर्ल्डकपमध्ये ‘ही’ कामगिरी करणारी पहिली भारतीय महिला फलंदाज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ चा अंतिम सामना भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघांमध्ये नवी मुंबईतील डॉ. डी वाय पाटील स्टेडियममध्ये झाला. पावसामुळे हा सामना नियमित वेळेपेक्षा २ तास उशिराने सुरू झाला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वुल्फार्टने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतलो. तर फलंदाजीला उतरलेल्या भारताच्या सलामीवीरांनी संघाला चांगली सुरूवात केली. भारतीय महिला संघाची स्टार सलामीवीर फलंदाज स्मृती मानधनाने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. स्मृतीने तिच्या डावात २१ धावा पूर्ण करताच टीम इंडियाची माजी कर्णधार मिताली राजचा एक मोठा विक्रम मोडला. तिला मागे टाकून पहिले स्थान गाठले आहे.

स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी फायनलमध्ये चांगली भागीदारी रचत संघाला चांगली सुरूवात करून दिली. स्मृती मानधनाने आतापर्यंत २०२५ च्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकात ४०० पेक्षा जास्त धावा केल्या. सर्वाधिक धावा करण्याच्या यादीत स्मृती दुसऱ्या स्थानावर आहे. भारतीय महिला खेळाडू म्हणून एका एकदिवसीय विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम स्मृतीने आपल्या नावावर केला आहे. टीम इंडियाची माजी कर्णधार मिताली राजच्या नावावर विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम होता. तिने २०१७ च्या महिला एकदिवसीय विश्वचषकात ४०९ धावा केल्या होत्या. स्मृती मानधनाने २०२५ च्या महिला एकदिवसीय विश्वचषकात आतापर्यंत ४१६ पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. स्मृती अजूनही मैदानावर कायम आहे. स्मृतीने सलामीवीर म्हणून विश्वचषक सामन्यांमध्ये भारताला चांगली सुरूवात करून दिली. एका एकदिवसीय विश्वचषकात सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय महिला खेळाडू स्मृती मानधना ४१६ धावा (२०२५) मिताली राज ४०९ धावा (२०१७) पूनम राऊत- ३८१ धावा (२०२७) हरमनप्रीत कौर ३५९ धावा (२०१७) स्मृती मानधना ३२७ धावा (२०२२)



## स्मृती मानधनाने एका वाक्यात जिंकली सर्वांची मने!

भारताने प्रथमच वर्ल्ड कपला गवसणी घातली आणि त्यानंतर भारताची नॅशनल क्रश स्मृती मानधना ही भावूक झाली. स्मृतीने सामना संपल्यावर एका वाक्यात सर्वांची मने जिंकल्याचे पाहायला मिळाले. या वर्ल्ड कपमध्ये स्मृतीची भूमिका सर्वात महत्वाची होती. कारण स्मृतीने या वर्ल्ड कपमध्ये भारताला चांगली सुरुवात करून देण्याचे काम चोख बजावले होते. या वर्ल्ड कपमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा या स्मृतीच्या नावावर होत्या. त्यामुळे या वर्ल्ड कप विजयात स्मृतीचा मोलाचा वाटा आहे. भारताने वर्ल्ड कप जिंकला आणि स्मृतीने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. वर्ल्ड कप जिंकल्यावर स्मृती म्हणाली की, “ मला कळत नाही की वर्ल्ड कप जिंकल्यावर कशी प्रतिक्रिया द्यावी. अजूनही मी स्वप्नातच बुडाली आहे. क्रिकेटच्या मैदानावर मी भावनिक झाली नाही. मात्र, हा एक अवास्तव क्षण आहे. घरचा विश्वचषक, आणि फक्त “ भारत चॅम्पियन” हे वाचून खूप आनंद होत आहे. माझ्यासाठी हा स्वप्नवत क्षण आहे. प्रत्येक विश्वचषक, आपण जातो आणि आपल्या सर्वांसाठी खूप दुःखाचे क्षण आले होते. महिला क्रिकेटमध्ये आपली जबाबदारी जास्त आहे, असे मला नेहमीच वाटते. खरतर आपल्याला मिळालेला पाठिंबा पाहून, म्हणजे, गेल्या ४० दिवसांचे कसे वर्णन करावे, हे मला कळत नाही. गेला टी२० विश्वचषक आमच्यासाठी कठीण होता. आमच्या फिटनेसवर काम करण्यावर, प्रत्येक पैलूवर काम करण्यावर आमचे स्पष्ट लक्ष होते. ज्या पद्धतीने सर्वजण एकत्र आले आणि खेळले. या विश्वचषकात, प्रत्येकजण एकमेकांसाठी होता. संघाचे वातावरण कसे आहे हे मी तुम्हाला सांगू शकत नाही आणि ही फक्त जादू आहे.” स्मृती मानधनाने यावेळी भारतीयांना अभिमानाचा क्षण दिला. भारत चॅम्पियन हे वाचून आनंद झाल्याचे सांगत स्मृतीने यावेळी सर्वांची मने जिंकली. भारतीय संघाने पहिल्यांदाच विश्वचषकाला गवसणी घातली. त्यामुळे भारतासाठी हा विजय सर्वात महत्वाचा ठरला. भारताच्या महिलांनी यावेळी अप्रतिम खेळ सादर केला. सर्व देशवासियांना आनंदाचे क्षण यावेळी दिले. यामध्ये स्मृती मानधनाचा वाटाही सर्वात महत्वाचा आहे.

# हरमनप्रीत कौरने मोडला बेलिंडा क्लार्कचा विक्रम



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. वुमन्स वनडे वर्ल्डकप स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताने दक्षिण अफ्रिकेसमोर विजयासाठी २९९ धावांचे आव्हान ठेवले होते. हरमनप्रीत कौर अंतिम फेरीत काही खास फलंदाजी करू शकली नाही. मात्र, तिने एक मोठा विक्रम मोडीत काढला आहे.

भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर फलंदाजीसाठी उतरली तेव्हा टीम इंडियाने १६६ धावांवर दोन विकेट गमावल्या होत्या. त्यामुळे हरमनप्रीत कौरकडून चांगल्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, तिने २९ चेंडूत २० धावा केल्या आणि बाद झाली. हरमनप्रीत कौरच्या छोट्या खेळीमुळे तिचे चाहते नाराज झाले. मात्र, हरमनप्रीत कौरने एक मोठा विश्वविक्रम मोडला आहे. तिने आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात बाद फेरीच्या सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम रचला आहे. हरमनप्रीत कौरने माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू बेलिंडा क्लार्कचा विक्रम मोडीत काढला आहे. तिने सहा डावांमध्ये ३३० धावा केल्या होत्या. हरमनप्रीत कौर आता चार डावांमध्ये सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली आहे.
हरमनप्रीतने ९ सामन्यांच्या ८ डावांमध्ये २६० धावा केल्या. तिने जवळपास ३३ च्या सरासरीने या धावा केल्या आहेत. या स्पर्धेत हरमनप्रीत कौरने दोन अर्धशतकेही झळकावली आहेत.

# भारतीय महिला संघास बीसीसीआयकडून १२५ कोटी आयसीसीकडून किती रुपये मिळणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध महिला एकदिवसीय विश्वचषक अंतिम सामना जिंकला, तर बीसीसीआयने त्यांना १२५ कोटी रुपयांचे मोठे बक्षीस देण्याची तयारी दर्शविली होती. बीसीसीआय हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाला पुरुष संघाइतकेच बक्षीस देण्याचा मानस व्यक्त केला होता. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, बीसीसीआय पुरुष आणि महिला खेळाडूंना समान वेतन देण्यावर विश्वास ठेवते. म्हणूनच, जर आमच्या महिला संघाने विश्वचषक जिंकला तर त्यांचे बक्षीस पुरुष संघापेक्षा कमी नसावे, यावर आम्ही चर्चा केली. दरम्यान, जेव्हा भारताने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली अमेरिकेत टी-२० विश्वचषक जिंकला तेव्हा बीसीसीआयने खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसह संपूर्ण संघाला १२५ कोटी रुपयांचा मोठा बोनस दिला होता. जर महिला संघाने यावेळी विजेतेपद जिंकले तर त्यांना समान रक्कम म्हणजे १२५ कोटी रुपये देणे हे भारतीय महिला क्रिकेटसाठी एक ऐतिहासिक पाऊल असेल.

# लहानपणीच वडील गेले, क्रिकेटच्या वेडापायी भावाच्या लग्नालाही मुकली

## रेणुकाची गोष्ट वाचून डोळे येतील भरून...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय महिला संघाने मुंबईत दक्षिण आफ्रिकेला हरवून पहिल्यांदाच क्रिकेट विश्वचषक जिंकला. हिमाचलची रेणुका ठाकुर संघाचा भाग होती. आता भारताच्या विजयानंतर सर्वत्र रेणुकाची चर्चा सुरु आहे. जाणून घ्या तिच्याविषयी...
भारतीय महिला संघाने क्रिकेट विश्वचषक जिंकला आहे. मुंबईत खेळलेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ५२ धावांनी हरवले. पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला. महत्त्वाची बाब म्हणजे या महिला संघाचा भाग हिमाचल प्रदेशची कन्या रेणुका ठाकुरही होती. ती वेगवान गोलंदाज म्हणून संघात ओळखली जाते.

खरे तर, महिला संघाच्या विजयानंतर शिमला जिल्ह्यातील रोहडू येथील रेणुका ठाकुरच्या घरी जल्लोषाचे वातावरण दिसले. शिमला जिल्ह्यातील रोहडू परिसरातील पारसा गावात राहणाऱ्या रेणुका ठाकुरच्या घरी विजयानंतर जल्लोष साजरा केला गेला. त्यानंतर आता सोमवारी संपूर्ण गावाला जेवण दिले जाणार आहे. गावकरी आपल्या कन्येच्या या ऐतिहासिक कामगिरीवर अभिमान बाळगत आहेत. टीम इंडियाच्या विजयानंतर रेणुकाची आई सुनीता आपल्या पतीच्या आठवणीत भावूक झाली आहे. रेणुकाचे वडील केहर सिंग ठाकुर यांचे निधन १९९९ मध्ये झाले होते. त्या वेळी रेणुका फक्त तीन वर्षांची होती. आई सुनीताने सांगितले, की वडिलांचे स्वप्न होते की त्यांची मुले मोठी होऊन क्रिकेटर बनावीत. रेणुकाच्या वडिलांनी आपल्या मुलाचे नाव प्रसिद्ध क्रिकेटर विनोद कांबळीच्या नावावर ठेवले होते. ते कांबळीचे मोठे चाहते होते. वडिलांच्या आठवणीत रेणुकाने आपल्या हातावर त्यांचा टॅटूही बनवला आहे. तिच्या आईने सांगितले, की रेणुकाने आपल्या वडिलांचे स्वप्न साकार करून दाखवले आहे. त्यांचे गाव पारसा अभिमानाने नाचत आहे. हा खूप आनंदाचा क्षण आहे. मिठाई वाटताना खूप आनंद आहे. आम्हाला खूप अभिमान वाटतो आहे. मुलींनी खूप संघर्ष केला. ऑस्ट्रेलियाला हरवले आणि आता दक्षिण आफ्रिकेला हरवले. सामन्यापूर्वी आम्ही देवी-देवतांना साकडे घातले होते. विश्वचषक भारताने जिंकावा यासाठी प्रार्थना केली होती. आमच्या गावाजवळ एक छोटा बस स्टँड आहे. तेथे एक छोटेसे मैदान आहे. तेथे कापडाच्या चेंडूने खेळणे सुरू केले होते. तिच्या काकांनी एकदा तिला क्रिकेट खेळताना पाहिले होते. नंतर धर्मशालातील अकादमीत दाखल करून दिले. मुलीला कधीही रोखले नाही. लहानपणी ओरडलोही की अभ्यास कर. मात्र, ती म्हणायची की ती अभ्यास करते आणि खेळतेही. घरी येताच सर्वांशी मिसळून राहते. अशा मुली सर्वांना मिळाव्यात. रेणुकाचे भाऊ विनोद ठाकुर म्हणाले, की हा पारसा गावासाठी आनंदाचा क्षण आहे. माझी बहीण गोलंदाजीमध्ये कमी धावा देते. आम्ही शाळेतून घरी येताच थेट मैदानात पोहोचायचो. आता मैदानाची स्थिती ठीक नाही, पण तेथे मोठ्या मुलांसोबत खेळायचो. चार वर्षांच्या वयात तिने खेळणे सुरू केले होते. १३ वर्षांच्या वयात ती पुढे गेली. रेणुका भावाच्या लग्नालाही गेली नव्हती.



# महिला ब्रिगेड वर्ल्ड कप जिंकताच हिटमॅन भावूक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## रोहितची अशी होती प्रतिक्रिया



वर्ल्ड कप फायनलमध्ये पराभूत झाल्यानंतर आणि विजय मिळवल्यानंतर कसे वाटते हे रोहित शर्माला चांगले माहिती आहे. भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप जिंकल्यानंतर रोहित भावूक झाला. रोहितचा आभाळाकडे पाहतानाचा एक फोटो व्हायरल झाला आहे.

भारतीय महिला संघाला २००५ आणि २०१७ साली वनडे वर्ल्ड कप फायनलमध्ये पराभूत व्हावे लागले. वूमन्स टीम इंडिया २०१७ च्या फायनलमध्ये इंग्लंड विरुद्ध वर्ल्ड कप ट्रॉफीपासून अवघ्या ९ धावांनी दूर राहिली. तेव्हापासून भारताच्या मनात पराभवाची सल होती. मात्र, भारताने तिसऱ्या प्रयत्नात वर्ल्ड कप ट्रॉफीला गवसणी घातली. दक्षिण आफ्रिकेवर मात करुन पहिल्यांदा वनडे वर्ल्ड कप जिंकला. भारताने २९९ धावांचा पाठलाग करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला २४६ धावांवर रोखले. भारत यासह वर्ल्ड कप जिंकणारा चौथा संघ ठरला. भारताने हरमनप्रीत कौर हीच्या नेतृत्वात ही कामगिरी केली. विशेष म्हणजे हरमनप्रीतने कर्णधार म्हणून पहिल्याच स्पर्धेत भारताला विश्व विजेता केले. भारताच्या या विजयानंतर संपूर्ण देशात आनंदाची लाट पसरली. भारतीय संघाचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे. भारताच्या या विजयानंतर मेन्स टीम इंडियाचा अनुभवी बॅट्समन रोहित शर्मा भावूक झालेला दिसला. मुलींच्या विजयानंतर रोहित भावूक भारतीय पुरुष संघाचे २००३ नंतर २०२३ साली वर्ल्ड चॅम्पियन होण्याचे स्वप्न भंगले होते. भारताने सलग सर्व सामने जिंकत फायनलमध्ये धडक दिली होती. मात्र, ऑस्ट्रेलियाने २००३ च्या जुन्या जखमेवर नव्याने मीठ चोळले. भारत वर्ल्ड कप जिंकता जिंकता राहिला. या पराभवानंतर कॅप्टन रोहितला अश्रू अनावर झाले होते. मात्र, भारतीय महिला संघाच्या विजयानंतर रोहितचे डोळे पाणावले. वर्ल्ड कप जिंकणे काय असते ? हे रोहितच्या भावमुद्रेवरुन जाणवत होते. रोहितच्या चेहऱ्यावर वर्ल्ड कप विजयाचा आनंद पाहायला मिळाला. रोहितचा हा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. रोहित हा महामुकाबला पाहण्यासाठी त्याची पत्नी रितिकासह स्टेडियममध्ये आला होता. रोहितने संपूर्ण सामना पाहिला. रोहितसह निता अंबानी उपस्थित होत्या. भारत वर्ल्ड कप जिंकणारा चौथा संघ टीम इंडियाने सेमी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचा धुव्वा उडवताच क्रिकेट विश्वाला नवा चॅम्पियन मिळणार हे निश्चित झाले. आतापर्यंत ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि न्यूझीलंड या ३ संघांनीच वनडे वर्ल्ड कप जिंकला होता. आता त्यानंतर भारतीय महिला संघाने या यादीत स्थान मिळवले आहे. दरम्यान, बॅटिंग आणि बॉलिंगने योगदान देणाऱ्या शफाली वर्मा हीला वूमन ऑफ द मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शफालीने सर्वाधिक ८७ धावा केल्या. तसेच निर्णायक क्षणी २ विकेट्स मिळवल्या.

# अमनजोत कौरच्या आनंदावर विरजण; वर्ल्डकप जिंकल्यानंतर समजली वाईट बातमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय महिला संघानी विश्वचषक जिंकला. विश्वचषक जिंकून महिलांनी इतिहासच रचला. मात्र, या सुवर्णक्षणानंतर भारतीय खेळाडूसाठी एक वाईट बातमी समोर आली.

हरमनप्रीत कौरच्या संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला हरवून इतिहास रचला. पहिल्यांदाच आयसीसी ट्रॉफी जिंकली. या ट्रॉफीसाठी संघातील प्रत्येक खेळाडूने आपले सर्वस्व पणाला लावले होते. प्रत्येक खेळाडूला त्यांच्या कुटुंबाचा आणि देशाचा पूर्ण पाठिंबा मिळाला. भारताच्या विश्वविजेत्या मोहिमेदरम्यान प्रत्येक आव्हानाला तोंड देत त्यांचे कुटुंब त्यांच्या पाठीशी उभे राहिले. अमनजोत कौरचे कुटुंबही तिच्या पाठीशी उभे राहिले आणि तिचे लक्ष विश्वचषकातून हलू नये म्हणून, तिला तिची आजी भगवंतीच्या हृदयविकाराची माहिती देण्यात आली नाही. अमनजोत कौरचे वडील भूपिंदर सिंग यांनी या आठवड्यात त्यांच्या ७५ वर्षीय मातोश्री भगवंतीला हृदयविकाराचा झटका आला. त्यांना रुग्णालयात नेले. भूपिंदरने त्यांच्या मातोश्रीच्या आजारपणाची बातमी त्यांची मुलगी, अष्टपैलू खेळाडू अमनजोत सिंगपासून लपवली. त्यांना विश्वचषक



खेळताना तिचे लक्ष विचलित होऊ नये असे वाटत होते. अमनजोत तिच्या आजीच्या खूप लाडकी आहे. जेव्हा अमनजोतने शेजारच्या मुलांसोबत क्रिकेट खेळायला सुरुवात केली तेव्हा तिची आजी पार्कमध्ये खुर्चीवर बसून तिला प्रोत्साहन द्यायची. तिला कोणीही त्रास देऊ नये याचीही ती काळजी घेत असे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नवी मुंबईत विश्वचषक जिंकला. तेव्हा तिच्या आईला सामन्यांचे नियमित अपडेट्स मिळावेत अशी व्यवस्था केली होती. माझी आई, भगवंती, अमनजोतची ताकद होती. गेल्या महिन्यात तिला हृदयविकाराचा झटका आला होता. मात्र, आम्ही अमनजोतला याबद्दल सांगितले नाही. गेल्या काही दिवसांपासून आम्ही तिच्या उपचारांसाठी रुग्णालयात आहोत. या तणावपूर्ण काळात विश्वचषक विजय आमच्यासाठी निश्चितच एक मलम ठरला आहे. या स्पर्धेत अमनजोत कौरने सात सामन्यांमध्ये ३६. ५० च्या सरासरीने आणि ८३. ९० च्या स्ट्राईक रेटने १४६ धावा केल्या. तिने सहा विकेट्सही घेतल्या. फायनल सामन्यात तिने एक महत्त्वाचा कॅच पकडला. त्यानंतर एकच चर्चा सुरु झाली की तिने कॅच नाही तर मॅचच जिंकली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून

## निवडणुकीतून उमटलेले अंतर्मुख प्रश्न!

आवश्यक आहे. त्यांचा हेतू योग्य असला तरी तो रचनात्मक मार्गाने पुढे न्यावा लागेल.
कारण बदल जर कटुतेने केला, तर तो विघातक ठरतो; पण संवादातून केलेला बदल तो संस्थेचा पुनर्जन्म ठरतो.

**७५ वर्षांची वाटचाल एक नवा अध्याय**

मराठी वाङमय मंडळ आता आपल्या स्थापनेचा ७५ वा (हिरक) महोत्सव साजरा करणार आहे. ही केवळ उत्सवाची संधी नाही, तर स्वतःकडे आरसा दाखवण्याची वेळ आहे. संस्थेच्या या टप्प्यावर विचार व्हावा. आपण मंडळात पदासाठी आलो का, की सेवा करण्यासाठी? आपण मतभेद मिटवले का, की वाढवले? आपण शब्दांच्या माध्यमातून जोडले का, की दुखावले?
बोध : "साहित्य म्हणजे शब्दांतून माणुसकीला स्पर्श करणे. संस्था म्हणजे त्या स्पर्शाला दिशा देणारे हृदय. आणि निवडणूक म्हणजे त्या हृदयाची परीक्षा." या परीक्षेत कोण जिंकले, कोण हरले यापेक्षा आपल्या मनातील साहित्यिकता जिवंत राहिली का? हा प्रश्न प्रत्येक सभासदाने स्वतःला विचारावा. शेवटचा विचार अमळनेरच्या मातीने अनेक साहित्यिक, विचारवंत, आणि कलाकार घडवले. हीच माती आता पुन्हा एकदा आपल्याला सांगते.
"संस्था टिकवायची असेल, तर अहंकाराला नव्हे, तर संस्काराला जागा द्या. पद मिळवायचे असेल, तर मनं जिंकण्यापासून सुरुवात करा.

## हे महिला बालविकास कार्यालय आहे की, भंगार मालाचे गोडावून ?

आणि दुर्गंधी यामुळे परिसर अत्यंत किळसवाणा झाला आहे. गेटजवळ पडलेली जुनी सायकल, विशेष म्हणजे इमारतीवरील फलकावरील "महिला बालविकास सेवा योजना" हे नावसुद्धा धूसर झाले आहे. अक्षरेच दिसत नसल्याने हे नेमके कोणते कार्यालय आहे ? हे ओळखणेही अवघड झाले आहे. जनतेच्या हितासाठी असलेले हे कार्यालय दुर्लक्षामुळे ओसाड व बेवारस अवस्थेत गेल्याचे चित्र आहे. रात्रीच्या अंधारात येथे अनेक गैरप्रकारही चालतात.
दररोज अनेक महिला, अंगणवाडीसेविका आणि विविध योजना, शासकीय कागदपत्रे, पोषण आहार किंवा मार्गदर्शनासाठी या कार्यालयात येतात. मात्र, त्यांना बसण्याची सोय नाही, स्वच्छता नाही, तसेच पावसाळ्यात चिखलात उभे राहूनच कामे करावी लागतात. इमारतीची दुरुस्ती करावी. स्वच्छता मोहिम राबवावी. परिसरातील गवत तोडावीत. तुटलेले गेट पुनर्स्थापित करण्याची मागणी होत आहे.

## अमळनेर येथून मोटर सायकल चोरीस

अमळनेर - कुंटे रोड परिसरातील एक मोटर सायकल (क्र. एम.एच.१९-डीजी-१९२३) चोरीस गेली आहे. मोहम्मंद रफीक अब्दुल रहेमान तेली यांच्या मालकीची मोटर सायकल आहे. ते एका दवाखान्यात उपचारासाठी गेले होते. ते परतल्यानंतर मोटर सायकल आढळून आली नाही. त्यांनी सर्वत्र शोध घेतल्यानंतरही या मोटार सायकलचा अद्याप तपास लागला नाही. याबाबत त्यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## जल्लोष विश्वकप विजयाचा...








# अंतुर्ली येथे आज कार्तिक स्वामींचा यात्रोत्सव!

## भाविकांची उसळणार गर्दी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- कार्तिक पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील अंतुर्ली येथे मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी कार्तिक स्वामींचा यात्रोत्सव होईल. महिलांना वर्षातून एकदाच फक्त विशिष्ट मुहुर्तावर कार्तिक स्वामींचे दर्शन घेता येते अशी अख्यायिका आहे. या पार्श्वभूमीवर महिलांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी उसळणार आहे.

कार्तिक पौर्णिमा दर्शन योग- यंदा मंगळवार, दि. ४ नोव्हेंबरला रात्री १० वाजून ३६ मिनिटांपासून ते बुधवार, दि. ५ नोव्हेंबर सायंकाळी ६ वाजून ४९ मिनिटांपर्यंत दर्शनाचा योग आहे. तर कृतिका नक्षत्र सकाळी ६ वाजून ३४ मिनिटांपासून ते मध्यरात्री ३ वाजून २८ मिनिटांपर्यंत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरावर भाविकांची प्रचंड गर्दी होणार आहे. मंदिर समितीतर्फे भाविकांच्या



सोयीसाठी पाणी, आरोग्य सुविधा, पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामस्थ आणि विविध सामाजिक संस्थांचे स्वयंसेवकही यात्रोत्सवासाठी परिश्रम घेत आहेत. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर संस्थानचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील यांनी केले आहे.

दरम्यान, यात्रोत्सवानिमित्त विविध खाद्य पदार्थ, पूजा-साहित्य विक्रेते तसेच बाळगोपाळांसाठी विविध झुले, पाळणे व्यावसायिकांनीही आपली दुकाने थाटली आहेत.

# सोने तिजोरीत ठेवू नका, एक आयडीया वापरल्यास पडेल पैशांचा पाऊस, जाणून घ्या नेमके कसे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोने आणि चांदीच्या दरात चढउतार पाहायला मिळत आहेत. मात्र, तुम्ही तुमच्याकडे असलेल्या सोन्याच्या मदतीने भरपूर पैसे कमवू शकता. त्यासाठी काही योजना आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या भावात मोठे चढऊतार चालू आहेत. सध्या सोन्याचा भाव घसरला आहे. पण दिवाळीपूर्वी हेच सोने चांगलेच चकाकले होते. दरम्यान, सुरक्षित गुंतवणूक म्हणून अनेकजण सोने, सोन्याचे नाणे, सोन्याचे बिस्कीट किंवा सोन्याचे दागिने तयार करतात. एकदा दागिने केले की ते तिजोरीत सुरक्षितपणे ठेवून दिले जातात. मात्र, तिजोरीत ठेवून दिलेल्या याच दागिन्यांचा योग्य पद्धतीने वापर केल्यास तुम्हाला भरपूर पैसे मिळू शकतात. गोल्ड लिजिंग, गोल्ड मोनिटायझेशन स्कीमचा वापर करून तुम्ही तुमच्या सोन्याच्या मदतीने भरपूर पैसे कमवू शकता. गोल्ड लिजिंगमध्ये तुम्ही तुमचे सोने भाड्याने घेतले जाते. म्हणजेच एका निश्चित काळासाठी तुम्ही सोने देऊन तुम्ही त्यावर पैसे कमवू शकता. यासाठी अनेक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत. या योजनेत ज्वेलर्स तुम्ही भाड्याने दिलेल्या सोन्यावर तुम्हाला दोन ते पाच टयांनी रिटर्न्स देतात. गोल्ड मॉनिटायझेसन स्कीममध्ये तुम्ही तुमचे सोने बँकेच्या लॉकरमध्ये ठेवू शकतात. बँक लॉकरमध्ये सोने ठेवल्यास बँक तुम्हाला तुमच्या सोन्यावर २. २५ टक्के ते २. ५ टक्के व्याज देते. या मार्गांनी तुम्ही तुमच्याकडे असलेल्या



सोन्याच्या मदतीने पैसे कमवू शकता.

(टीप- लेखात दिलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपाची आहे. कुठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष गुंतवणूक करायची असेल किंवा कोणताही आर्थिक निर्णय घ्यावयचा असेल तर त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या.)



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता, विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234




# राज्यस्तरीय फोटोग्राफी स्पर्धेत विशाल चौधरींनी पटकावला प्रथम क्रमांक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमरावती येथे चकाटे फोटो स्टुडिओतर्फे राज्यस्तरीय फोटोग्राफी स्पर्धा आणि प्रदर्शन झाले. यात अमळनेर येथील फोटोग्राफर विशाल चौधरी यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. खानदेशच्या शिरपेचात त्यांनी मानाचा तुरा रोवला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

२८, २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी या स्पर्धा झाल्या. राज्यातील छायाचित्रकारांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धेत उत्सव, वाइल्ड लाईफ, वेडिंग आणि किड्स कॅटेगरी हे चार विभाग होते. यात श्री. चौधरी यांनी किड्स कॅटेगरी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. स्पर्धेच्या समारोपास डॉ. दीपक थोते, प्राचार्य बिरला, डॉ. प्रशांत देशपांडे, डॉ. राजेश चंदनपाट, सुनीता भोळे, मनोज कपसे, पवनकुमार आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, श्री. चौधरी यांचे खानदेशसह अमळनेर तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले आहे.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत म्हणण्याचे निर्देश

## शिक्षण विभागाकडून परिपत्रक जारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशाचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या निर्मितीला दीडशे वर्ष पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये 'वंदे मातरम्' गीताच्या सगळ्या कडव्यांचे गायन करण्याचे आणि गीताचा इतिहास सांगणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी आणि रईस शेख यांनी या निर्णयाला विरोध दर्शविला आहे. दुसरीकडे, भाजपने या दोन्ही आमदारांवर हल्लाबोल केला असून, त्यांना पाकिस्तानात जाण्याचा सल्ला दिला आहे.

शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव अ. रा. कुलकर्णी यांनी शिक्षण आयुक्तांना यासंदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्षपूर्तीच्या पार्श्वभूमीवर ठाणे येथील राजमाता जिजाबाई ट्रस्टतर्फे शिक्षण विभागाला पत्र देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये उपक्रम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य मंडळाच्या शाळांची दिवाळीची सुट्टी संपली आहे. ३ नोव्हेंबरपासून शाळा सुरू होणार आहेत. तथापि, सीबीएसई, आयसीईएसई अशा अन्य मंडळांशी संलग्न शाळा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे दुसऱ्या शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच शाळांमध्ये उपक्रम आयोजित करावा लागणार आहे.

**आदेश मागे घ्या : आझमी, शेख**

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचे पूर्ण गायन करण्याची राज्यातील सर्व शाळांवर केलेली सक्ती मागे घ्यावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे मुंबईतील आमदार अबू आझमी आणि भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्र्यांसह शालेय शिक्षण मंत्र्यांना केली आहे. सरकार गुणवत्तापूर्ण शिक्षणाऐवजी ज्ञानाच्या क्षेत्रात धार्मिक मुद्दे आणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सांस्कृतिक अजेंडा रेटत असल्याचा आरोप या दोन्ही आमदारांनी केला आहे.

**...तर पाकिस्तानला चालते व्हा**

'वंदे मातरम्'ला अबू आझमी आणि रईस शेख यांचा एवढा विरोध कशासाठी, असा सवाल करून त्यांना या देशात राहून वंदे मातरम् म्हणायचे नसेल तर त्यांनी पाकिस्तानात चालते व्हावे, अशा शब्दांत भाजपने या दोन्ही आमदारांवर निशाणा साधला आहे. मंत्री मंगल प्रभात लोढा आणि भाजपचे प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन यांनी दोन्ही आमदारांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# श्री तुळशी विवाह पूजन -२०२५

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कार्तिकी अर्थात प्रबोधिनी एकादशी रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५ पासूनच तुळशी विवाहास प्रारंभ झालेला आहे. तुळशी विवाहाची सांगता बुधवार, दि. ५ नोव्हेबर २०२५ रोजी कार्तिक पौर्णिमेस होईल.



### तुळशी विवाह पूजन साहित्य

**साहित्य :** तुळशीची कुंडी, देवघरातील बाळकृष्ण किंवा शाळीग्राम, आंतरपाठसाठी कोरे पांढरे कापड व त्यावर मध्यभागी कुंकुवणे स्वस्तिक काढलेले, पाच ऊस, एक चौरंग व पाट, पंचामृत २ वाट्यांमध्ये, २ ग्लास भरून शुद्ध पाणी, पळी, २ ताम्हण/प्लेट, हळदी-कुंकू, अष्टगंध, अक्षता, नैवेद्यासाठी-गूळ-खोबरे, खडीसाखर व गोड पदार्थ, धूप, दीप, देव पुसण्याचे व हात पुसण्याचे कापड, अत्तर, विड्याची पाने-६ नग, सुपारी-३ नग, बदाम, खारीक, क्वॉईन-३ नग.

**नववधू तुळशीसाठी :** कापसाचे वस्त्र, कापडी वस्त्र (पीस), मंगळसूत्र, पुष्पहार-२, हिरव्या बांगड्या ६/१२, काजळ, ओटी साहित्य.

### तुळशी विवाह पूजन पूर्वतयारी व कृती

१) पूजन अगोदर तुळशीची कुंडी चुना, गेरूच्या सहाय्याने रंगवावी व त्यावर श्रीकृष्ण दामोदर अशी नावे लिहावीत.

२) शक्य असल्यास चार उसांचा मांडव करावा व तुळशीमागे एक ऊस मामा म्हणून उभा करावा. मांडव न जमल्यास किमान तुळशीमागे एक ऊस उभा करावा.

३) नववधू तुळशीसाठी वरीलप्रमाणे सर्व साहित्य ज्यात मंगळसूत्र, बांगड्या, ओटी साहित्य इत्यादी सर्व तयार ठेवावे.

४) आंतरपाठसाठी पांढरे कोरे कापड असावे. सर्व पूजन साहित्य पूजन ठिकाणी असावे.

५) पूजन झाल्यावर मंगलाष्टके आधी वधू : माता तुळशी पाटावर पूर्वेकडे मुख येईल अशी ठेवावी व वर :- भगवान श्रीकृष्ण चौरंगावर पश्चिमेकडे मुख येईल, असे असावेत. मंगलाष्टके झाल्यावर श्रीकृष्ण यांना मुलीने माता तुळशींकडून हार घालावा व त्यानंतर भगवान श्रीकृष्ण यांच्याकडून मुलीने माता तुळशींना हार घालावा.

६) मंगलाष्टके झाल्यावर भगवान बालकृष्ण तुळशी कुंड्यात काही वेळ ठेवावेत व नंतर आरती करावी व अर्पण केलेला गोड पदार्थ/चुरमुरे/फराळ पदार्थ प्रसाद म्हणून वाटावा.

७) पूजनानंतर अर्पण पडलेल्या अक्षता जमा करून व्यवस्थित निर्माल्यात टाकाव्यात. पालकांनी याच थोड्या अक्षता शुभ दिवशी आपल्या उपवर वधू मुला-मुलींच्या डोक्यावर टाकाव्यात.

# कार्तिक स्वामी : देवांचे सेनापती, युद्धाचे देव

**ग्लोबल महातेज**

कार्तिक स्वामी ऊर्फ कार्तिकेय हे हिंदू पुराणातील एक महत्त्वाचे देव आहेत. कार्तिक स्वामी यांचा जन्म स्कंद षष्ठी या दिवशी झाला. ते भगवान शिव आणि माता पार्वती यांचे ज्येष्ठ पुत्र, तर गणपती बाप्पांचे मोठे भाऊ आहेत. कार्तिक स्वामी हे देवांचे सेनापती आणि युद्धाचे देव आहेत. त्यांना स्कंद, कुमार, षण्मुख, अंगार, अग्निभू, गंगापुत्र, महासेन, मंगळ (ग्रह), शक्तीधर, सिद्धसेन विशाख या नावांनीही ओळखले जाते.

### पूजा-विधी

कार्तिक स्वामी यांची तशी उत्तर भारतात पूजा कमी होते. दक्षिण भारतात मात्र ते खूप महत्त्वाचे देव मानले जातात.

### कार्तिक पौर्णिमा

कार्तिक पौर्णिमेच्या



दिवशी कार्तिक स्वामींच्या दर्शनाबद्दल अनेक समज-गैरसमज आहेत. मात्र या दिवशी अनेक ठिकाणी विशेष पूजा आणि उत्सव साजरे होतात. कार्तिक महिना, पौर्णिमा आणि कृत्तिका नक्षत्र या तीन गोष्टी जेव्हा एकत्र येतात तेव्हा म्हणजे कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ज्या काळात कृत्तिका नक्षत्र असेल तेव्हा कार्तिक स्वामींचे दर्शन घेण्याचा शुभ काल मानला जातो.

### कार्तिक स्वामींबद्दलचे गैरसमज

महिलांनी दर्शन घेऊ नये

अनेक ठिकाणी असा समज आहे, की महिलांनी कार्तिक स्वामींचे दर्शन घेऊ नये. कारण त्यांना त्यांचा शाप आहे. मात्र इतर वेळी कार्तिक स्वामींचे दर्शन हे पौराणिक संदर्भानुसार सर्व महिलांना वर्ज्य असले, तरी या दिवशी महिलाही त्यांचे दर्शन घेऊ शकतात, अशी मान्यता आहे.

### कार्तिक स्वामींच्या मंदिराबद्दल...

कार्तिक स्वामींच्या काही मंदिरांमध्ये (उदा.- देवदरी अंभेरी, सातारा) कार्तिक पौर्णिमेच्या दिवशीच भाविकांना दर्शन दिले जाते. बाकीच्या ठिकाणची मंदिरे वर्षभर बंद असतात.

### कार्तिक पौर्णिमेचे महत्त्व

हिंदू धर्मग्रंथांमध्ये कार्तिक पौर्णिमा ही सर्वांत पवित्र तिथी मानली जाते. विविध धार्मिक ग्रंथांमध्ये या दिवसाचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले आहे. भगवान विष्णू यांचा मत्स्यावतार कार्तिक पौर्णिमेस जन्मला होता. हा दिवस विश्वाच्या विनाश आणि पुनर्निर्मितीच्या कथेशी संबंधित असल्याची मान्यता आहे. या दिवशी केलेले पुण्यकर्म इतर दिवसांपेक्षा जास्त फलदायी असते. गंगा नदीत स्नान करणे आणि दिवे लावणे हे विशेषतः पुण्यपूर्ण मानले जाते. हा दिवस भगवान शिव यांच्या भक्तांसाठी देखील विशेष आहे. कारण त्याला त्रिपुरारी पौर्णिमा असेही म्हणतात. या दिवशी भगवान शिव यांनी त्रिपुरासुराचा वध केला, जो जगासाठी मोठा धोका निर्माण करणारा राक्षस होता. म्हणूनच हा दिवस वाईटावर चांगल्याचा विजय म्हणूनही साजरा होतो.

### स्नान आणि दानाचे महत्त्व

कार्तिक पौर्णिमेस गंगा, यमुना आणि इतर पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे अत्यंत पुण्यपूर्ण मानले जाते. या दिवशी गंगेत स्नान केल्याने सर्व पापे धुऊन मोक्ष मिळतो. म्हणूनच भारताच्या विविध भागांतील लोक या दिवशी गंगेच्या काठावर एकत्र येतात आणि स्नान केल्यावर प्रार्थना करतात. या दिवशी दानालाही महत्त्व आहे. ब्राह्मण, निराधार, गरीब आणि गरजूंना धान्य, कपडे, फळे, पैसे आणि इतर आवश्यक वस्तू दान केल्याने पापांचा नाश होतो आणि पुण्य मिळते. याच दिवशीचा प्रमुख उपक्रम म्हणजे दीपदान, अंधार दूर करून जीवनात प्रकाश पसरविण्याचे प्रतीक आहे. या विधीदरम्यान लोक त्यांच्या घराजवळ, मंदिरांमध्ये आणि नद्यांच्या काठावर दिवे लावतात. या दिनी अन्नधान्य, अन्नदान करणे हे सर्वोत्तम मानले जाते.

### कार्तिक स्वामींच्या दर्शनासाठी यंदाचे मुहूर्त

कार्तिक स्वामींच्या दर्शनासाठी कार्तिक पौर्णिमेचा दिवस अतिशय महत्त्वाचा असतो. हिंदू कॅलेंडरनुसार यंदा ५ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्तिक पौर्णिमा साजरी होणार आहे. मात्र, शुभ मुहूर्त ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजून ३६ मिनिटांनी सुरू होईल आणि ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजून ४८ मिनिटांपर्यंत असेल. उदयतिथी (शुभ दिवस) हिंदू धर्मात ओळखली जाते. त्यामुळे कार्तिक पौर्णिमा ५ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाईल.

# कार्तिक एकादशीला तुळस आणि शाळीग्राम विवाहाची प्रथा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कार्तिक मासातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथी आहे. यालाच देवप्रबोधिनी एकादशी असेही म्हणतात. या दिवशी तुळशी पूजनाचे विशेष महत्त्व आहे. तुळस आणि शाळीग्राम यांचे लग्न या दिवशी लावले जाते. उज्जैनच्या ज्योतिषाचार्यांच्या मते नेपाळमधील गंडकी नदीसुद्धा तुळशीचे एक रूप आहे. याविषयी शास्त्रामध्ये एक कथाही आहे.

प्राचीन काळी शंखचूड नावाचा एक पराक्रमी राक्षस होता. या राक्षसाचे लग्न वृंदा नावाच्या एका मुलीशी झाले. वृंदा भगवान विष्णू यांची भक्त होती. वृंदाच्या पतीव्रता धर्मामुळे शंखचूड अजेय झाला होता. या गोष्टीचा शंखचूडला खूप अहंकार आणि गर्व झाला होता. तो स्वर्गातील देवतांना, अप्सरांना त्रास देऊ लागला. दुःखी होऊन सर्व देवता भगवान विष्णू यांना शरण गेले आणि शंखचूडच्या त्रासातून मुक्त करण्याची प्रार्थना करू लागले. भगवान विष्णू यांनी आपल्या माया शक्तीने शंखचूडचे रूप धारण केले. माया शक्तीने त्यांनी वृंदाचा पतीव्रता धर्म नष्ट केला. यामुळे शंखचूडची शक्ती क्षीण झाली. युद्धामध्ये तो मृत्युमुखी पडला. जेव्हा वृंदाला भगवान विष्णू यांच्या छळ-कपट याबद्दल समजले तेव्हा तिने विष्णूंना दगड होण्याचा शाप दिला. देवतांच्या प्रार्थनेनंतर वृंदाने शाप परत घेतला. परंतु भगवान विष्णू वृंदासोबत केलेल्या छळ-कपट यामुळे स्वतःला दोषी समजत होते. त्यांनी वृंदाच्या शापाचा मान ठेवण्यासाठी स्वतःचे एक रूप दगडामध्ये प्रकट केले. या दगडातील रूपाला शाळीग्राम म्हटले जाते.

भगवान विष्णू यांनी वृंदाला सांगितले, की पुढील जन्मात तू तुळशीच्या रूपात प्रकट होशील आणि लक्ष्मीपेक्षा मला जास्त प्रिय राहशील. तुझे स्थान माझ्या डोक्यावर असेल. मी तुझ्याशिवाय अन्नग्रहण करणार नाही. याच कारणामुळे भगवान विष्णू यांच्या प्रसादामध्ये तुळशीचे पान अवश्य टाकले जाते. तुळस न टाकलेला प्रसाद भगवान विष्णू स्वीकार करत नाहीत. भगवान विष्णू यांना दिलेला शाप परत घेतल्यानंतर वृंदा जलंधरसोबत सती झाली. वृंदेच्या राखेमधून माता तुळशीचे रोप बाहेर आले. वृंदाची मर्यादा आणि पवित्रता कायम ठेवण्यासाठी देवतांनी भगवान विष्णू यांच्या शाळीग्राम रूपाचे लग्न माता तुळशी यांच्यासोबत केले.

याच कारणामुळे भगवान विष्णू आणि तुळस कोणत्याही ठिकाणी असल्यास दुःख, अडचणी, त्रासामधून मुक्ती मिळते. नारायण स्वरूप हेच शाळीग्राम दगड विष्णूच्या वेगवेगळ्या रूप आणि अवतारांच्या नावाचे असतात. हे खूप चमत्कारिक दगड मानले गेले आहेत. या दगडांना केवळ स्पर्श केला तरी प्रत्येक कामात यश मिळते.

### कोठे मिळतात शाळीग्राम?

शाळीग्रामला भगवान विष्णू यांचे रूप मानले जाते. ज्याप्रमाणे महादेवांची शिवलिंग स्वरूपात पूजा केली जाते, त्याचप्रमाणे भगवान विष्णू यांची शाळीग्राम रूपात पूजा केली जाते. नेपाळमध्ये मुक्तनाथ येथे गंडकी नदीत पुष्कळ शाळीग्राम आढळतात. शाळीग्रामावरील मुखे व चक्रे यावरून त्याची परीक्षा करतात. याचे ८९ प्रकार असून रंगावरून याच्या प्रकारांना पुढील नावे दिली आहेत. शुभ्र पांढरा वासुदेव, निळाहिरण्यगर्भ, काळा विष्णू, गडद हिरवाश्रीनारायण, तांबडा प्रद्युम्न आणि गडद निळा नरसिंह किंवा वामन. बारा चक्रे असलेल्या शाळीग्रामाला अनंत म्हणतात.

# वैकुंठ एकादशी-आध्यात्मिक अर्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकादशी म्हणजे केवळ उपवासाचा दिवस नव्हे, तर मन, इंद्रिय आणि विचारांची शुद्धी करण्याचा दिवस आहे. पण वैकुंठ एकादशी ही सर्व एकादशींपैकी श्रेष्ठ मानली गेली आहे. कारण या दिवशी 'वैकुंठ' म्हणजेच मोक्षद्वार उघडते, असे शास्त्र सांगते.



### वैकुंठ म्हणजे काय?

'वैकुंठ' हा शब्द 'कुंठा नसलेला' असा अर्थ देतो. जेथे शंका, भय, द्वेष, क्रोध, अहंकार या कुंठा नाहीत, तेच वैकुंठ. भगवान विष्णू यांचे निवासस्थान म्हणून त्याचा उल्लेख येतो. मात्र प्रत्यक्षात तो आपल्या अंतःकरणातील एक स्थिती आहे. जेव्हा मनात शांती, प्रेम आणि श्रद्धा जागते तेव्हा त्या क्षणी माणूस वैकुंठात प्रवेश करतो.

### उपवासाचा अर्थ

या दिवशी केलेला उपवास म्हणजे फक्त अन्नत्याग नव्हे. तो दोषांचा त्याग आहे. अन्न न घेणे हे शरीरशुद्धीचे साधन आहे. विचारांचे नियंत्रण हे आत्मशुद्धीचे साधन आहे. एकादशीला 'पापहारिणी' म्हटले आहे. कारण ती मनातील रज-तम गुण कमी करून सत्त्वगुण वाढविते.

### भगवान विष्णू यांचे जागरण

वैकुंठ एकादशी ही श्रीहरिंच्या अर्थात भगवान विष्णू यांच्या जागरणाची रात्र म्हणून ओळखली जाते. पण खरे तर जागरण बाह्य नाही, अंतःकरणाचे जागरण आहे. मनाची झोप म्हणजे अज्ञान आणि त्या झोपेतून उठविणारी एकादशी म्हणजे ज्ञान, विवेक आणि भक्ती यांचे जागरण.

### श्रीमद्भगवद्गीतेतील अर्थ

श्रीमद्भगवद्गीतेत श्रीकृष्ण म्हणतात-

**"यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति॥"**

हीच वैकुंठ स्थिती आहे. जेथे प्रत्येक ठिकाणी परमेश्वर दिसतो. तेव्हा द्वेष, मत्सर, स्पर्धा नष्ट होतात. मनात केवळ करुणा उरते.

### अंतर्मनातील वैकुंठ

या दिवशी मंदिरे 'वैकुंठद्वार' उघडतात. पण खरा दरवाजा आपल्या हृदयात आहे. जो माणूस आपल्या मनातील राग, लोभ, अहंकाराचा दरवाजा बंद करून प्रेम, शांतता आणि भक्तीचे दार उघडतो त्याच्यासाठी दररोजच वैकुंठ एकादशी होते. वैकुंठ एकादशी ही केवळ एक धार्मिक परंपरा नाही. ती आत्मोन्नतीचा उत्सव आहे. या दिवशी आपण उपवास, जप, ध्यान, वाचन आणि दान करून भगवान विष्णूस्थितीतील समता आणि करुणा विकसित केली, तर आपले जीवनच वैकुंठमय होते. म्हणजेच देह झोपेल, पण चेतना जागी राहिली पाहिजे. मंदिर उघडेल, पण हृदयाचे वैकुंठद्वारही उघडले पाहिजे.

# मंदिरात केव्हा करावी पूजा ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोमवारी शिवमंदिरात, मंगळवारी हनुमान मंदिरात, बुधवारी दुर्गामातेच्या मंदिरात, शुक्रवारी कालीमाता आणि लक्ष्मीमातेच्या मंदिरात, शनिवारी शनी मंदिरात आणि रविवारी विष्णू मंदिरात जाण्याचे उल्लेख धर्मग्रंथांत सापडतात. गुरुवार हा श्रीहरी विष्णू आणि गुरूंचा वार मानला जातो. चला पाहूया हिंदू धर्मात मंदिरात कोणत्या वेळेस पूजा करणे योग्य असते.

### गुरुवार सर्वश्रेष्ठ का मानला जातो?

रविवारी दिशा पूर्वेकडे असते. पण गुरुवारी दिशा ईशान म्हणजेच ईशान्य दिशेला असते. ही दिशा देवतांचा निवासस्थान मानली जाते. प्रवासात गुरुवारी पश्चिम, उत्तर आणि ईशान दिशा शुभ मानली जाते. या दिवशी पूर्व, दक्षिण व नैर्ऋत्य दिशेचा प्रवास वर्ज्य मानला जातो. गुरुवाराची प्रकृती 'क्षिप्र' म्हणजे जलद फल देणारी असते. हिंदू शास्त्रानुसार या दिवशी सर्व धार्मिक व शुभ कार्ये अधिक फलदायी ठरतात. म्हणूनच प्रत्येक गुरुवारी मंदिरात जाऊन पूजा, प्रार्थना किंवा ध्यान करावे, असे शास्त्र सांगते.

### मंदिरात जाण्याची योग्य वेळ

हिंदू धर्मात मंदिरात जाण्यालाही विशिष्ट वेळ असते. संधिकाल म्हणजे सूर्य आणि ताऱ्यांपासून मुक्त असलेला दिवस-रात्र यांचा संगम. ऋषी-मुनींनी या वेळेला अत्यंत पवित्र मानले आहे. संध्योपासना म्हणजेच सायंकाळची प्रार्थना या वेळेस केली जाते. या संधीच्या पाच वेळा असतात. मात्र त्यात प्रातःकाल (सूर्योदयपूर्व) आणि सायंकाळ (सूर्यास्तपूर्व) या वेळा अत्यंत पवित्र मानल्या जातात. यावेळी मंदिरात जाऊन अथवा एकांतात बसून शौच, आचमन, प्राणायाम करून गायत्री मंत्राद्वारे ईश्वराची प्रार्थना केली जाते.

### दुपारी मंदिरात जाणे निषिद्ध

दुपारी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मंदिरात जाणे, पूजा, आरती किंवा प्रार्थना करणे निषिद्ध मानले गेले आहे. म्हणूनच सकाळी ११ वाजेपूर्वी मंदिरात जावे किंवा दुपारी ४ वाजेनंतर मंदिरात जावे. असे शास्त्रानुसार योग्य आहे.

